# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी

## आस्थापना विभाग

### <u>नोटीस</u>

महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचाऱ्यांची सेवाजेष्ठता यादी दि. २१/०६/२०२१ महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-अ अधिसूचनेनुसार तयार करण्यात आली असून, सदर सेवाजेष्ठता यादी आज दि. १५/१०/२०२४ रोजी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली असून सदर सेवाजेष्ठता यादी महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील आस्थापना विभागात व प्रभाग समिती १ ते ५ मध्ये पहाण्यास मिळेल. सदर सेवाजेष्ठता यादीबाबत कोणत्याही कर्मचाऱ्यांची नावे, सेवाजेष्ठता क्रमांक, शैक्षणिक पात्रता, पदनाम, नेमणूक तारीख, संवर्ग, मंजूर वेतनश्रेणी पदोन्नती दिनांक, प्रवर्ग, जन्मतारीख सेवानिवृत्त तारीख याबाबत कोणाची सूचना/हरकती असल्यास त्यांनी नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत आस्थापना विभागात सादर कराव्यात. विहीत मुदतीनंतर आलेल्या हरकती / सुचना विचारात घेतल्या जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

(शैलेश दोंदे)
उप आयुक्त (मुख्यालय)
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका